13 — 15

गट ग्रामपंचायतीखालील गांवास स्वतंत्र ग्राम पंचायती स्थापन करणेबाबत.

Copy

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक : एलएक्यु-५६९/व्हीपीएम-११६९/२३५९४-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक :- १६ जुलै १९६९.

## प रि प त्र क.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४ खाली स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे राज्य सरकारचे अधिकार सर्व विभागीय आयुक्तांना दिलेले आहेत. यास्तव कोणत्याहि गांवाने स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी केल्यावर त्या गांवच्या संबंधित ग्राम पंचायतीशी व जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीशी विचार विनिमय करुन मागणी मान्य वा अमान्य करण्याबाबतचा निर्णय विभागीय आयुक्तांनी घ्यावयाचा असतो. स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याकरितां आयुक्तांना शासनाने मार्गदर्शनपर आदेश दिलेले आहेत. त्या आदेशानुसार त्यांनी प्रस्तावावर निर्णय घ्यावयाचा असतो. गांवची लोकसंख्या, नवीन पंचायतीची आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्णता इत्यादि बाबींचा विचार करुन आयुक्तांनी निर्णय घ्यावयाचा असतो. परंतु शासनाच्या निदर्शनास आले आहे कीं, ज्या गांवी स्वतंत्र ग्राम पंचायतीची मागणी केलेली असते त्या गांवची लोकसंख्या कमी असल्याच्या सबबीखाली किंवा संबंधित गट ग्रामपंचायतीची नव्यानें स्थापन होणाऱ्या ग्राम पंचायतीला मान्यता नाही या कारणास्तव गट विकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती व स्थायी समिती प्रस्तावावर निर्णय घेवून प्रस्ताव विभागीय आयुक्ताकडे निर्णयासाठी न पाठवितां अमान्य करतात. स्वतंत्र ग्रामपंचायतीचा प्रस्ताव मान्य वा अमान्य करण्याची बाब सर्वस्वी विभागीय आयुक्तांच्या अधिकारातील आहे. गट विकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती व स्थायी समिती यांना प्रस्ताव कोणत्याहि कारणास्तव अमान्य करण्याचे अधिकार नाही.

२. सर्व विभागीय आयुक्तांना विनंती करण्यांत येते कीं, त्यांनी त्यांच्या अधिक्षेत्रातील सर्व गट विकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती व स्थायी समिती यांना आदेश द्यावेत कीं, त्यांनी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या प्रस्तावावर कोणत्याहि कारणास्तव निर्णय न घेतां प्रत्येक प्रस्ताव विभागीय आयुक्ताकडे अंतिम निर्णयासाठीं पाठवावा. तसेंच मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४(२) खाली विभागीय आयुक्तांनी फक्त संबंधित ग्राम पंचायतीशी व स्थायी समितीशी विचार विनिमय करण्याचा असतो. परंतु कांही प्रकरणांत पंचायत समितीचा अभिप्राय घेण्यांत येतो असे दिसून आले आहे. विभागीय आयुक्तांना विनंती करण्यांत येते की त्यांनी पंचायत समित्यांना सुचना द्याव्यांत कीं, पंचायत समित्यांनी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्तावावर अभिप्राय देण्याची व त्याकरितां ठराव पास करण्याची आवश्यकता नाही.

OFFICE OF THE COLLECTOR,

O-N

३. संबंधित ग्रामपंचायतीने व स्थायी समितीने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्तावावर त्यांचा अभिप्राय द्यावयाचा असतो व त्यांचा अभिप्राय हा विभागीय आयुक्तावर बंधनकारक नाही. संबंधित ग्राम पंचायतीने वा स्थायी समितीने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याविरुध्द अभिप्राय दिला तरी विभागीय आयुक्तांनी प्रत्येक प्रस्तावावर शासकीय आदेश लक्षांत घेवून निर्णय घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

17/7/69

अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
सर्व जिल्हाधिकारी (जिल्हाधिकारी मुंबई यांचे खेरीज).